**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२१/२०२१-२२/०८/वेतनपथक, पुणे दिनांक – १८ ऑक्टोबर, २०२१

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,

विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर सस्था, पुणे

**विषय - वेतन अनुदान माहे ऑक्टोबर - २०२१.**

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोबर, २०२१ चे वेतन अनुदानाची विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती तयार करुन त्याप्रमाणे सदरहू माहिती एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी **आणि सदरहू देयक दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ पर्यंत या कार्यालयाकडे फॉरवर्ड करण्यात येऊन त्याची इमेलदेखील दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ पर्यंत पाठविण्यात यावी.**

माहे ऑक्टोबर, २०२१ या महिन्याचे वेतन देयक नियमीत पद्धतीने ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने तयार करण्यात येऊन फॉरवर्ड/सादर करावे.

माहे ऑक्टोबर, २०२१ चे वेतन देयक सादर करतांना अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेसाठी (डी.सी.पी.एस.) कर्मचा-यांची नोव्हेंबर, २००५ या महिन्याची कपात करावयाची असून त्यासाठी मूळ वेतन अधिक महागाई वेतन यावर **महागाई भत्त्याचे २१ टक्के दराने परिगणन करावे.**

**जे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी माहे डिसेंबर, २०२१ मध्ये सेवानिवृत्त होणार आहेत त्यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम कपात करण्यात येऊ नये.**

**माहे सप्टेंबर २०२१ या महिन्याच्या वेतनापेक्षा माहे ऑक्टोबर, २०२१ या महिन्याचे वेतन देयकामध्ये वेतननिश्चितीमुळे ज्या कर्मचा-याच्या वेतनामध्ये फरक पडला आहे त्यांच्या वेतननिश्चितीच्या पीडीएफ मधील प्रतीदेखील ऑक्टोबर, २०२१ या महिन्याच्या वेतन देयकासोबत इमेलद्वारे सादर करण्यात याव्यात.**

**माहे ऑक्टोबर, २०२१ चे वेतन देयकासोबत खालील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**उपयोगिता प्रमाणपत्र**

**प्रमाणित करण्यात येते की खाली नमूद केलेली माहिती अचूक असून त्याची खात्री मी स्वतः यासाठीच्या आवश्यक असणा-या सर्व नोंदवहया तपासून करुन घेतली आहे. यामध्ये काही चुक आढळल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.**

| अ. क्र. | महिना | तपशील | सहसंचालक पुणे यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेतन खात्यामध्ये जमा केलेली रक्कम | प्रत्यक्ष वितरीत रक्कम | शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| | | **एकूण** | | | | |

**या कार्यालयाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, या विभागाच्या अधिपत्याखालील काही महाविद्यालये या कार्यालयाने वेतन अनुदान महाविद्यालयाच्या खात्यामध्ये जमा करुन देखील कर्मचा-यांच्या खात्यामध्ये त्याच दिवशी अथवा दुस-या कामाच्या दिवशी जमा करीत नाहीत. तरी या पत्राद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, या कार्यालयाने संबंधीत महिन्याचे वेतन अनुदान प्राचार्यांचे खात्यावर जमा केल्यानंतर त्याच दिवशी अथवा दुस-या कामाच्या दिवशी संबंधीत कर्मचा-यांच्या वेतन खात्यामध्ये जमा करावे. तसेच या पुढे प्राचार्यांच्या नावे बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये महाविद्यालयाच्या नावे उघडलेल्या वेतन खात्याच्या संबंधीत महिन्याचे बँक स्टेटमेंटची प्रतदेखील वेतन देयकासोबत इमेलद्वारे सादर करावी.**

तरी उपरोक्त बाबी विचारात घेऊन आपण आपले महाविद्यालय/अकृषी आणि अभिमत विद्यापीठाचे माहे ऑक्टोबर, २०२१ चे वेतन देयक एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये फॉरवर्ड करावे आणि अशा ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने तयार केलेल्या वेतन देयकाची विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती इमेलद्वारे payunit@jdhepune.info या इमेल आयडीवर **दिनांक २० ऑक्टोबर, २०२१** पर्यंत सादर करावी.

**सही/-**

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे